तात्काळ/अति—महत्वाचे

# मुंबई विद्यापीठ

**परिपत्रक** :— क्र. टीएएएस(युटी/सीटी)/०५/२०२०—२०२१

**विषय:— विद्यापीठातील विविध विषयांच्या विभागामध्ये कार्यरत असलेल्या तज्ज्ञांच्या नावाची यादी मिळणेबाबत.**

संदर्भ:— क्रमांक २२६५/५१५८/२०२०/१८ दिनांक २३ जानेवारी, २०२०

मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व शासकीय आणि अशासकीय, अनुदानीत व विनाअनुदानीत कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, अध्यापक, नृत्य, होम सायन्स आणि सोशल वर्क, महाविद्यालयांचे प्राचार्य व महाविद्यालयातर्फे संबंधित संस्थाचे अध्यक्ष/सचिव, मुंबई विद्यापीठातील विविध विभागांचे विभागप्रमुख, सर जे.जे. वास्तुशास्त्र महाविद्यालय, संचालक, दुर व मुक्त अध्ययन संस्था, समन्वयक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, अंबाडवे, समन्वयक, विजयालक्ष्मी विश्वनाथ दळवी महाविद्यालय, तळेरे, समन्वयक रत्नागिरी उपकेंद्र, समन्वयक ठाणे उपकेंद्र यांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत महाराष्ट्र शासनातील राजपत्रित/अराजपत्रित पदे भरण्याकरीता विविध स्पर्धा परीक्षा व चाळणी परीक्षा आयोजित केल्या जातात. सदर परिक्षांकरिता प्रश्नांचा दर्जा सुयोग्य व उच्चतम काठिण्यपातळी नुसार असणे अपेक्षीत असून सदर परीक्षांचे पेपर काढण्याकरीता आयोगास त्या त्या विषयातील तज्ञ अध्यापकांची Paper setters/Reviewers/Assessors/Moderators इत्यादींची कामाकरीता विद्यापीठ महाविद्यालये/संस्थेत कार्यरत असणाऱ्या त्या त्या विषयातील अनुभवी प्राध्यापक/सहयोगी प्राध्यापक/सहायक प्राध्यापक यांची विषयनिहाय तज्ञसुची अद्ययावत यादी आयोगास पाठविण्यास यावी अशी विनंती केली आहे.

तरी आपणास विनंती करण्यात येते की, आपल्या विभागातील व संलग्नीत महाविद्यालयातील किमान १० वर्षाचा अध्यापकीय/संशोधकीय अनुभव असलेल्या तज्ञांची नावे सोबत जोडलेल्या Annexture -A नमुन्यामध्ये तसेच Annexture-B नमुना नुसार आवश्यक असलेल्या अध्यापकांसंबंधी वैयक्तिक माहिती संबंधीतांकडून कृपया भरून घ्यावीत व ती Annexture -A सोबत जोडून कृपया आयोगास पाठविण्यात यावीत.

तसेच ज्या अध्यापकांची नावे आयोगाच्या कार्यालयास कळविण्यात येणार आहेत अशा तज्ज्ञांची सचोटी व चारित्र्य पडताळणी तसेच त्यांच्या विरूद्ध कोणतीही शिस्तभंगाची कार्यवाही प्रस्तावित/प्रलंबित नाही याबाबत कृपया आपल्या पत्रामध्ये प्रमाणित करून आयोगास कळवावे, ही विनंती.

मुंबई – ४०० ०३२.
दिनांक :– ~~सप्टेंबर~~, २०२०
२० ऑक्टोबर

(डॉ. विनोद पाटील)
स्थानापन्न कुलसचिव

प्रति,

मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व शासकीय आणि अशासकीय, अनुदानीत व विनाअनुदानीत कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, अध्यापक, नृत्य, होम सायन्स आणि सोशल वर्क, महाविद्यालयांचे प्राचार्य व महाविद्यालयातर्फे संबंधित संस्थाचे अध्यक्ष/सचिव, मुंबई विद्यापीठातील विविध विभागांचे विभागप्रमुख, सर जे.जे. वास्तुशास्त्र महाविद्यालय, संचालक, दुर व मुक्त अध्ययन संस्था, समन्वयक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, अंबाडवे, समन्वयक, विजयालक्ष्मी विश्वनाथ दळवी महाविद्यालय, तळेरे, समन्वयक रत्नागिरी उपकेंद्र, समन्वयक ठाणे उपकेंद्र यांचे माहितीसाठी आणि पुढील कार्यवाहीसाठी.

Annexture B चा नमुना आयोगाच्या www.mpsc.gov.in/https://mahampsc.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. तसेच Annexture-A ची soft copy (Excel format) आयोगाच्या confi18mpsc@gmail.com या ईमेलवर कृपया अद्यावत यादी पाठविण्यात यावी.